# हवामान अंदाजावर आधारीत विशेष कृषि सल्ला (कोकण विभाग)

(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)

(०२३५८) २८२३८७

दिनांक १२/१०/२०२०


| डॉ. प्रशांत बोडके, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


## हवामान सारांश

**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या कडून प्राप्त अंदाजानुसार पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र दिनांक १२ आणि १३ ऑक्टोबर २०२० दरम्यान अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. याचाच परिणाम म्हणून दिनांक १५ ऑक्टोबर. २०२० रोजी अरबी समुद्रात उत्तर कोकण आणि दक्षिण गुजरात किनारपट्टी भागात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.**

**कमी दाबाच्या क्षेत्रामुळे संपूर्ण कोकणात पाचही दिवस पर्जन्यवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.**

## इशारा

| जिल्हा | इशारा | इशारा | इशारा | इशारा | इशारा |
|---|---|---|---|---|---|
| | १२ ऑक्टोबर, २०२० | १३ ऑक्टोबर, २०२० | १४ ऑक्टोबर, २०२० | १५ ऑक्टोबर, २०२० | १६ ऑक्टोबर, २०२० |
| रत्नागिरी | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता |
| सिंधुदुर्ग | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार ते अति जोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता | इशारा नाही |
| रायगड | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता |
| ठाणे | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता |
| पालघर | इशारा नाही | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता | जिल्हयातील तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता |

## कृषी सल्ला

| | |
|---|---|
| **भात** | • पाचही दिवस तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता तयार भात पिकाची कापणी पाउसाचा अंदाज घेवून करावी आणि कापणी केलेले भात शेतात न ठेवता लगेचच सुरक्षित ठिकाणी नेऊन लगेच मळणी करून धान्य वाळविण्यासाठी सुरक्षित ठिकाणी पसरून ठेवावे. |
| **नाचणी/ नागली** | • पाचही दिवस तुरळक ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता पाउसाचा अंदाज घेवून तयार नागली पिकाची कणसे विळ्याने कापून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे आणि वाळल्या नंतर मळणी करावी. |
| **भाजीपाला व नवीन फळबाग लागवड** | • सर्वप्रकारच्या नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला लागवडीमधील पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी. |
| **आंबा** | • आंबा बागेतील जुन्या अनुत्पादित झाडांची तसेच घन लागवड केलेल्या बागांची छाटणीची कामे पुढे ढकलावी.<br>• आंबा बागेतील नवीन पालवी वरील किड व रोग नियंत्रणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी. |
| **काजू** | • काजू बागेतील नवीन पालवी वरील किड व रोग नियंत्रणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी. |
| **नारळ, सुपारी, चिकू, केळी** | • जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ, सुपारी, केळी आणि चिकू बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• नारळ बागेत किड व रोग नियंत्रणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी. |
| **पशुधन/ कुकुटपालन** | • विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊसाची शक्यता असल्याने कोंबड्या, गाई, म्हशीं, शेळ्या व इतर जनावरांचे योग्य ते संरक्षण करावे. |
| **मासेमारी** | • दिनांक १३ ते १६ ऑक्टोबर दरम्यान वादळी वाऱ्याची शक्यता असल्याने मच्छिमार बांधवांनी मासेमारीकरिता समुद्रात जावू नये. |